रत्नागिरी जिल्हा पोलीस
MAHARASHTRA POLICE
Ratnagiri District Police

जा.क्र.आस्था-१/पोभ/22352/२०१७
पोलीस अधीक्षक यांचे कार्यालय,
रत्नागिरी दिनांक : 06/०७/२०१७

विषय :- पोलीस शिपाई या पदावर नियुक्तीबाबत.

## आदेश

---ooo---

रत्नागिरी जिल्हा पोलीस दलात सन २०१७ मध्ये पोलीस शिपाई पदासाठी पोलीस भरती आयोजित करण्यांत आली होती. त्यामध्ये निवड यादीवरील खालील उमेदवाराची निवड करण्यांत आली असून महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९,भाग १ मधील नियम क्र.६३ मध्ये दिलेल्या अधिकारानुसार खालील नमुद उमेदवारांची पोलीस शिपाई या पदावर वेतन बॅन्ड रुपये ५२००-२०२०० ग्रेड वेतन रुपये २००० विशेष वेतन ५००/-मध्ये वेतन बॅन्ड मधील वेतन रुपये ६४६०/- व ग्रेड वेतन २०००/- या प्रारंभीक वेतनावर (अधिक शासकिय नियमानुसार देय असणारे इतर भत्ते) हजर झाल्या दिनांकापासून,अस्थायी स्वरुपात खालील नमुद अटी व शर्थीचे अधिन राहून नियुक्ती करण्यांत येत आहे.

निवड यादीवरील समांतर आरक्षणातील उमेदवार

| अ.क्र | उमेदवाराचे नांव | चेस्ट नंबर | ज्या प्रवर्गातून निवड करण्यांत झाली प्रवर्ग | देण्यांत आलेला बक्कल नंबर |
|---|---|---|---|---|
| १. | श्रुती नंदकुमार गिजबिले | ५४५५ | खुला महिला | ००३८ |
| २. | अमोल गजानन दळवी | ०२२० | खुला | ००४५ |
| ३. | नयना नवनाथ राणे | ५०३१ | खुला महिला | ००५२ |
| ४. | अश्विनी आनंदा पाटील | ५२०४ | खुला | ००८१ |
| ५. | रामदास बाबासो पाटील | २१४३ | खुला | ०१०१ |
| ६. | सारिका कुमार जाधव | ५५४७ | खुला महिला | ०१०३ |
| ७. | नितेश चंद्रकांत आर्डे | १५७४ | खुला | ०१०७ |
| ८. | प्रतिक्षा संताजी पवार | ५१३२ | खुला महिला | ०१६० |
| ९. | सुरेखा जानू वरक | ५२८७ | खुला महिला | ०२०५ |
| १०. | नरेश विष्णू गुरव | ०४०६ | खुला | ०२१० |
| ११. | सुशांत नागनाथ नरळे | ४४३४ | खुला | ०२१४ |
| १२. | रेश्मा विजय चौधरी | ५२०५ | खुला महिला | ०२२० |
| १३. | रियाज करीमखान मुजावर | १४९७ | इमाव | ०२२५ |
| १४. | अभिषेक अनंत कुळये | १५७८ | इमाव | ०२३२ |
| १५. | भुषण शांताराम पाताडे | २१७८ | इमाव | ०२४२ |
| १६. | वर्षा विलास राजापकर | ५५६६ | इमाव महिला | ०२५४ |
| १७ | सारिका काशिराम माटल | ५०९१ | इमाव महिला | ०२५७ |
| १८ | प्रितेश पर्शुराम रहाटे | १४८८ | इमाव | ०२६४ |
| १९ | शर्मिला शांताराम पाष्टे | ५३१२ | इमाव महिला | ०२७० |
| २० | वर्षा विजय राऊत | ५४८४ | इमाव महिला | ०२८० |
| २१ | दिगंबर महिपती शेलार | २४९८ | इमाव | ०३२९ |
| २२ | करिष्मा वामन तांबे | ५२१८ | अनुसूचित जा. महिला | ०३४६ |
| २३ | हनुमंत ज्ञानेश्वर नाईकनवरे | ४३४६ | अनुसूचित जाती | ०४११ |

| अ.क्र | उमेदवाराचे नांव | चेस्ट नंबर | ज्या प्रवर्गातून निवड करण्यांत झाली प्रवर्ग | देण्यांत आलेला बक्कल नंबर |
|---|---|---|---|---|
| २४ | अमित बाळासो भोसले | ०४४ | अनुसूचित जाती | ०४२४ |
| २५ | पंकज चारुदत्त साटविलकर | ०९६० | अनुसूचित जाती | ०४२७ |
| २६ | कांचन रविंद्र होडावडेकर | ५६२१ | अनुसूचित जा. महिला | ०४३४ |
| २७ | पवन प्रकाश पांगरीकर | २१९६ | अ.जा. | ०४८९ |
| २८ | स्नेहल रमेश कांबळे | ५०१४ | अ.जा. महिला | ०४९३ |
| २९ | शर्मिला कर्मा कोकणी | ५५०३ | अनु. जमाती महिला | ०४९५ |
| ३० | आकाश ईश्वरलाल जगताप | ०४०० | अनुसूचित जमाती | ०४९८ |
| ३१ | किरण अंकुश चव्हाण | ५१६५ | विजा - अ महिला | ०५०९ |
| ३२ | शरद शंकर जाधव | १७५६ | विजा - अ | ०५२५ |
| ३३ | प्रदीप दत्तात्रय भांडे | ३३४२ | भ.ज. - ब | ०५३६ |
| ३४ | नंदा शिवाजी मोहिते | ५२८८ | भ.ज. - ब महिला | ०५७१ |
| ३५ | सुशिला अशोक खरात | ५२२४ | भ.ज. - क महिला | ०६०९ |
| ३६ | लक्ष्मण विष्णू ढोले | ४१९१ | भ.ज. - ड | ०६३२ |
| ३७ | स्वप्निल प्रताप घाटगे | १५२५ | सर्वसाधारण होमगार्ड | ०६५४ |
| ३८ | प्रफुल मंगेश कदम | ०५१० | इमाव होमगार्ड | ०६५५ |
| ३९ | विजय अशोक आंब्रे | १४८७ | पोलीस पाल्य | ०७०२ |
| ४० | उमेश प्रभाकर ब्रीद | ४५८८ | मा. सैनिक सर्वसाधारण | ०७१६ |
| ४१ | शिवाजी आनंदा कळंत्रे | ४६०४ | मा. सैनिक सर्वसाधारण | ०७२६ |
| ४२ | आनंदा बंडू यादव | ४५९२ | मा. सैनिक इमाव | ०७५६ |

**अटी व शर्ती :**

१) वरील उमेदवारांची नेमणूक ही पुर्णतः हंगामी व तात्पुरत्या स्वरुपाची असून शासनास त्यांच्या सेवेची आवश्यकता नसल्यास कोणत्याही प्रकारचे कारण न दर्शविता अथवा आगाऊ सुचना न देता केव्हाही सेवेतून सेवामुक्त करण्यांत येईल.

२) सदर उमेदवारांच्या नियुक्तीस एक वर्षाचा कालावधी झाल्याने त्यांची पुन्हा चारित्र्य पडताळणी करून उमेदवांरांच्या चारित्र्य पडताळणीचे अहवाल समाधानकारक असण्याच्या शर्तीवर त्यांची नियुक्ती करण्यात येत आहे. परंतु त्यांचे चारित्र्य पडताळणी अहवालात आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास तसेच उमेदवाराने स्वहस्ताक्षरात भरुन दिलेल्या साक्षांकन नमुना फॉर्ममध्ये भरुन दिलेली माहिती खोटी/चुकीची दिल्याचे निदर्शनास आल्यास त्यांना कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांची सेवा संपुष्टात आणली जाईल.

३) प्रशिक्षण कालावधीमध्ये त्यांना कोणत्याही प्रकारची रजा मिळणार नाही, तसेच त्यांना त्यांचे प्रशिक्षणाचे मुख्यालय सोडता येणार नाही.

४) पोलीस दलात सेवेच्या अनुषंगाने योग्यता व पात्रता तपासण्यासाठी उमेदवारांची पोलीस प्रशिक्षण विद्यालयामध्ये मानसिक चाचणी (Psychological test) घेण्यांत येईल. सदर चाचणीत उमेदवार अपात्र ठरल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल.

५)त्यांची नियुक्ती पोलीस दलामध्ये मोटार परिवहन विभाग,आयुधिक विभाग, मरिन विभाग वगैरे विभागामध्ये आवश्यकतेप्रमाणे केली जाईल व ती त्यांच्यावर बंधनकारक राहिल.

६) तसेच वरील उमेदवारांची मातृभाषा मराठी असल्याने त्यांना सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रमांक मभाप/१०८७/१४/सीआर-२/८७/२०, दि.३०/०२/१९८७ अन्वये व महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९,भाग-१ मधील नियम क्र.९९ अन्वये एतदर्थ मंडळाची मराठी भाषाची परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट देण्यांत येत आहे.

७) महाराष्ट्र शासन वित्त विभाग निर्णय क्रमांक अंनियो/१००५/१२६/सेवा-४ दिनांक ३१/१०/२००५ अन्वये राज्य शासनाचे सेवेत दिनांक १/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाया कर्मचायांसाठी परिभाषीत अंशदान निवृत्ती योजना (Defined Contribution pension Scheme) लागू होईल तसेच सध्या अस्तीत्वात असलेली निवृत्ती योजना आणि सर्व साधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही. सदर शासन निर्णय क्रमांक अंनियो/१००५/१२६/सेवा-४,दिनांक ३१/०५/२००५ मध्ये नमुद केल्या प्रमाणे पे-बँन्ड अधिक ग्रेड-पे अधिक महागाई भत्ता या रक्कमेच्या १० टक्के मासीक अंशदान दर महाचे वेतनातून कपात करण्यांत येईल व ती रक्कम निवृत्ती पर्यत काढता येणार नाही.

८) सुधारीत पोलीस शिपाई भरती सेवाप्रवेश नियम-२०११ अन्वये पोलीस शिपाई या पदावर नेमणूक झालेल्या उमेदवारास,मराठी व हिंदी परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर,त्या उमेदवारास हिंदी व मराठी भाषा परीक्षेबाबत केलेल्या नियमानुसार उत्तीर्ण व्हाव्या लागतील.

९) सुधारीत पोलीस शिपाई भरती सेवाप्रवेश नियम-२०११ अन्वये पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारांस या पदासाठी विहीत केलेले प्रशिक्षण पुर्ण करावे लागेल व संबंधीत परिक्षा चार संधीमध्ये उत्तीर्ण व्हावे लागेल, जर चार संधीमध्ये आपण परिक्षा उत्तीर्ण झाला नाही तर आपली सेवा समाप्त करण्यांत येईल. प्रशिक्षण कालावधीत वार्षिक वेतनवाढी अनुज्ञेय राहणार नाही.

१०) सुधारीत पोलीस शिपाई भरती सेवाप्रवेश नियम-२०११ अन्वये पोलीस शिपाई या पदावर नियुक्त केलेल्या उमेदवारांना मुंबई पोलीस मॅन्युअल १९५९,मुंबई पोलीस (शिस्त व अपिल) नियम १९५६ व राज्य शासनाने वेळोवेळी विहीत केलेले अन्य नियम लागू होतील.

११) सुधारीत पोलीस शिपाई भरती सेवाप्रवेश नियम-२०११ अन्वये पोलीस शिपाई पदावर उमेदवारास ज्या घटकात नियुक्ती देण्यांत आलेली आहे त्या घटकाव्यतिरिक्त इतर पोलीस घटकात आपली बदली करता येणार नाही.

१२) महाराष्ट्र शासन गृह विभाग पत्र.क्र.पीएसबी-०३११/प्र.क्र.५२१/पोल-५-अ, दि.२६/०९/२०११ अन्वये पोलीस शिपाई या पदावर निवड झालेल्या उमेदवारांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तीन वर्षात पोलीस शिपाई या पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास त्या उमेदवारांकडून प्रशिक्षणावर झालेला सर्व खर्च प्रशिक्षण कालावधीत अदा केलेले वेतन व भत्त्यासहित होणारी रक्कम वसूल करण्यांत येईल.

१३) मा.उच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेवून शासनाने शासन निर्णय क्र.बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/ २०१११६-ब, दिनांक १२ डिसेंबर २०११ अन्वये सरळसेवा भरतीमध्ये ज्या उमेदवारांची निवड विशिष्ट मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली आहे,.अशा उमेदवारास,त्याच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यांत यावी या शासन निर्णयानुसार संबंधीत उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यात येत आहे. उमेदवारांने नियुक्ती आदेश प्राप्त झाले दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेवून सदरचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.तथापी आपणास नियुक्तीचे आदेश प्राप्त झाले दिनांकापासून जात वैधता प्रमाणपत्र सहा महिने पर्यत नियुक्ती प्राधिका-याकडे सादर न केल्यास आपल्या नियुक्तीचे आदेश आपोआप संपुष्टात येतील.

१४) विशिष्ट मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर ज्या उमेदवारांची निवड झाली आहे, अशा उमेदवारांनी नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यांसाठी संबधित जात पडताळणी समितीकडे सादर करणे आवश्यक आहे.जात पडताळणी समितीने दिलेल्या पोच पावतीची साक्षांकीत प्रत या कार्यालयास सादर करावी. जात पडताळणी समितीने त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर त्यांस दिलेले नियुक्तीचे आदेश त्वरीत रद्द केले जातील आणि त्याच्या विरुध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती,विमुक्त,भटक्या जमाती,इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्यांचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील तरतूदी नुसार कारवाई केली जाईल.

१५) निवड झालेल्या उमेदवारांनी भरतीच्या वेळी स्वतः लिहून दिलेल्या बंधपत्राअन्वये चारचाकी वाहन चालक परवाना, संगणक हाताळणी प्रमाणपत्र (एमएससीआयटी) विहीत मुदतीत सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहील.

( प्रणय अशोक )
पोलीस अधीक्षक,रत्नागिरी.

प्रति,

वरील सर्व संबधित

प्रत,

२)राखीव पोलीस निरीक्षक, मुख्यालय रत्नागिरी

२/- _ नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना नियमानुसार देय असणारा शासकिय सरंजाम अदा करण्यांत यावा.तसेच त्यांच्या वेतनाच्या आकारणीसाठी हजर झालेचा दिनांक त्वरीत लेखा शाखेत कळवावा व सेवापट उघडण्यांसाठी आस्थापना शाखेत कळवावा.

३)लेखा शाखा लेखा-३ (दोन प्रतीत)
४)प्रमुख लिपीक पत्रव्यवहार शाखा,
५)जिल्हा पोलीस दर्शनिका,